| 3 | Rashmi Housing Private Limited (INE425T07018) | Non-Convertible Debenture having face value of ₹ 1,00,000 each (NCDs) | 2500 | 22.70% | ₹ 21,78,94,455 | ₹ 7,55,10,000 | Cases u/s 138 of NI Act Liquidation under IBC 2016; Invoked PG under IBC 2016 |
| 4 | VSPL Projects Private Limited (INE479T07015) | Non-Convertible Debenture having face value of ₹ 1,00,000 each (NCDs) | 2200 | 23.20% | ₹ 13,79,32,808 | ₹ 15,41,00,000 | Cases u/s 138 of NI Act Liquidation under IBC 2016 |
| 5 | Samruddhi Realty Limited (INE621O07039) (INE621O07054) | Non-Convertible Debenture having face value of ₹ 1,00,000 each (NCDs) | 562 | 20.00% | ₹ 5,62,00,000 | ₹ 2,35,00,000 | Cases u/s 138 of NI Act Liquidation under IBC 2016; Invoked PG under IBC 2016 |
| 6 | CMRS Projects Private Limited (INE321W07013) | Non-Convertible Debenture having face value of ₹ 1,00,000 each (NCDs) | 200 | 22.00% | ₹ 50,00,000 | ₹ 82,00,000 | Cases u/s 138 of NI Act Insolvency application under IBC 2016 |
| | TOTAL | | 12,262 | | ₹ 81,50,27,263 | ₹ 79,69,70,000 | |

Any person resident in India is eligible to bid. A bidder has to bid for entire quantity of all 12,262 NCDs as a lot and the bid price has to be quoted for the entire lot and not individually. Part bid shall not be entertained. Any person who is interested in buying these NCDs can submit their bid via email to **divestments@mmnissim.com.** The last date for submission of bid is **28/11/2023 up to 18:30 hours.** All bids from persons meeting the qualification criteria will be presented to ASSET-1 Investment Committee for its final decision.
The Investment Committee reserves its right to accept or reject any bid at its sole discretion without assigning any reason including right to accept or reject any bid at a price which is lower or higher than the valuation as of Sep 30th 2023 completed by an independent valuers.

### कुर्ला येथे सुटकेसमध्ये तरुणीचा मृतदेह

# चारित्र्याच्या संशयावरून हत्या करणाऱ्या प्रियकराला अटक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**




**मुंबई :** लिव्ह इनमध्ये राहत असलेल्या प्रेयसीची चारित्र्याच्या संशयावरून हत्या करून तिचा मृतदेह सुटकेसमध्ये भरून फेकल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धारावीत राहणाऱ्या २२ वर्षीय तरुणाला अटक केली. कुर्ला परिसरात रविवारी एका सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळला होता. त्याप्रकरणी कुर्ला पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई पोलिसांना रविवारी दुपारी १२:३०च्या सुमारास शांतीनगर येथील सीएसटी रोडवर एक अज्ञात सुटकेस पडल्याची माहिती मिळाली. या सुटकेसमध्ये२५ वर्षीय तरुणीचा मृतदेह सापडला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी गुन्हे शाखेच्या कक्ष ५ व कक्ष ११ यांची आठ तपास पथके तयार केली. मृतदेहाचे छायाचित्र, अंगावरील कपडे यांच्या साहाय्याने मृत तरुणीची ओळख पटवण्याचा प्रयत्न पोलिसांनी सुरू केला. त्यावेळी मृत तरुणी धारावी परिसरात राहणारी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या मुलीचा प्रियकर अस्कर मनोज बरला (२२) मूळ गावी ओडिशाला पळून जाण्याच्या तयारीत होता. ठाणे रेल्वे स्थानकावर सापळा रचून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

प्रतिमा पवल किसपट्टा (२५) असे मृत मुलीचे नाव असून ती आरोपी बरलासोबत लिव्ह इन रिलेशनमध्ये धारावी परिसरात राहत होती. चारित्र्याच्या संशयावरून झालेल्या वादातून आरोपीने तिची गळा दाबून हत्या केली.

# उपनगरांतील पुनर्विकास महाग

## ‘धारावी टीडीआर’चा विकासकांना फटका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**


**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पात निर्माण होणारा हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) रेडी रेकनरच्या ९० टक्के दराने घेण्याची सक्ती करताना इंडेक्सेशनविना टीडीआरचा वापर प्रस्तावित केल्यामुळे उपनगरातील पुनर्विकास प्रचंड महागणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. या उलट हा टीडीआर सध्याच्या प्रचलित धोरणानुसार उपलब्ध करून दिला असता तर स्पर्धा वाढून टीडीआरचा सध्याचा दर आटोक्यात राहिला असता, असे या क्षेत्रातील जाणकारांना वाटते.

धारावी पुनर्विकास हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्यासाठी अदानी समूहाच्या विशेष हेतू कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे. या कंपनीत राज्य शासनाचा २० टक्के, तर अदानी समूहाचा ८० टक्के वाटा आहे. हा प्रकल्प व्यवहार्य व्हावा यासाठी राज्य शासनाने अनेक सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यातच इतर पुनर्विकासात ४० टक्के टीडीआर वापराची सक्ती व रेडी रेकनरच्या ९० टक्के दर निश्चित झाल्यामुळे टीडीआरचे दर अवाच्या सव्वा वाढणार आहेत. सध्या बाजारात ३० ते ४० टक्के दराने टीडीआर उपलब्ध आहे. परंतु धारावीतील टीडीआरचा दर ९० टक्क्यांपर्यंत वाढविल्यामुळे अन्य टीडीआरधारकही आता त्याच दराची अपेक्षा करतील. त्यामुळे धारावीतील टीडीआर उपलब्ध होईपर्यंत हे दरही चढे राहतील, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

सध्याच्या धोरणानुसार, टीडीआर कुठेही वापरण्याची मुभा असली तरी इंडेक्सेशन लागू आहे. याचा अर्थ उपनगरात रेडी रेकनरच्या दरानुसार जितका टीडीआर उपलब्ध होईल, तितकाच टीडीआर शहर वा अन्य मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध होणार नाही. उदाहरणार्थ, वांद्रे पश्चिम येथे उपलब्ध झालेला टीडीआर हजार चौरस मीटर असेल तर मालाड पश्चिम येथे तो यापेक्षा अधिक उपलब्ध होईल. शहरात परवडणारा टीडीआर उपनगरात मात्र प्रचंड महाग असेल.

### अन्य टीडीआरची खरेदीही त्याच दराने...

उपनगरात टीडीआरची सर्वाधिक मागणी असते. म्हाडा वा झोपडपट्टी पुनर्वसनात टीडीआरची आवश्यकता नसते. मात्र खासगी इमारतींच्या पुनर्विकासात टीडीआर आवश्यक असतो. मूळ चटईक्षेत्रफळ एक व त्यावर आणखी एक इतका टीडीआर वापरता येतो. त्यापैकी पॉइंट ३३ टीडीआर महापालिकेकडून सवलतीच्या दरात मिळतो. परंतु



उर्वरित पॉइंट ६७ टीडीआर विकासकांना खुल्या बाजारातून घ्यावा लागतो. धारावीचा टीडीआर उपलब्ध होईल तेव्हा तो ४० टक्के घ्यावा लागेल. परंतु धारावीचा टीडीआर ज्या दराने उपलब्ध होईल त्याच दराने आता अन्य टीडीआरही खरेदी करावा लागेल, असेही विकासकांनी सांगितले. सध्या याबाबत जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेवर हरकती व सूचना पाठविण्यासाठी महिनाभराचा कालावधी देण्यात आला आहे.

# जागतिक साखर उत्पादनात ३५ लाख टन घट

## जागतिक अन्न संघटनेचा अंदाज; एल निनोचा परिणाम

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** प्रशांत महासागरात सक्रिय असलेल्या एल निनोमुळे जागतिक साखर उत्पादन सुमारे ३५ लाख टन घटण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्राच्या जागतिक अन्न संघटनेने (एफएओ) व्यक्त केला आहे. जगात दरवर्षी सरासरी १७०८.६२ लाख टन साखर उत्पादन होते.

जागतिक अन्न संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात सक्रिय असलेल्या एल निनोमुळे आशियाई देशांत पर्जन्यवृष्टीत तूट निर्माण झाली आहे. जगभरात सरासरी तापमानात वाढ झाली आहे. अपुरा पाऊस आणि उष्णतेमुळे उसाच्या वाढीवर परिणाम झाला आहे. साखर उत्पादक चीन, थायलंड, भारत, पाकिस्तान या आशियाई देशांच्या साखर उत्पादनात तूट येण्याचा अंदाज आहे. थायलंडमध्ये सरासरी १०० लाख टनांवरून ८० लाख टनांवर तर भारतात साखर उत्पादन ३३७ लाख टनांपर्यंत खाली येण्याचा अंदाज आहे. २०२१-२२ मध्ये देशात ३५८ लाख टन साखर उत्पादन झाले होते.

‘एफएओ’च्या माहितीनुसार, जागतिक साखर बाजारात २००९ नंतर साखरेच्या साठ्यात यंदा मोठी घट होणार आहे. जागतिक साखर बाजारात दोन महिन्यांत साखरेच्या दरात ५५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारतीय साखर कारखाना संघाने (इस्मा) भारताच्या साखर उत्पादनात आठ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. थायलंडच्या साखर कारखाना संघटनेने १५ टक्क्यांची घट होण्यासह उसाच्या उत्पादनावर आणि दर्जावरही परिणाम झाल्याचे म्हटले आहे. अमेरिकेच्या कृषी विभागानेही थायलंडमधील साखर उत्पादनात १५ टक्क्यांनी घट होण्याच्या अंदाजाला दुजोरा दिला.

### जागतिक साखर बाजार

- **साखर उत्पादन :** सरासरी १७०८.६२ लाख टन
- **जगाला दरवर्षी लागणारी साखर :** सरासरी १६८४.७९० लाख टन
- **एफएओचा अंदाज :** जागतिक उत्पादनात ३५ लाख टन घट
- **भारताचे यंदाचे साखर उत्पादन :** ३३७ लाख टन (अंदाज)

### ब्राझीलचा दिलासा?

जागतिक साखर संघटना आणि ग्रो इंटेलिजेन्स, या कृषी क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या खासगी कंपनीने ब्राझीलमधील साखर उत्पादनात २० टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ब्राझीलमध्ये उसाची उपलब्धता चांगली असल्यामुळे यंदा साखर उत्पादन ४२१ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. एल-निनोमुळे जगभरातील अन्य देशांत साखर उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. त्या पार्श्वभूमीवर जागतिक साखर बाजाराला ब्राझीलमधील उत्पादनामुळे दिलासा मिळणार आहे. मागील वर्षी ब्राझीलचे साखर उत्पादन ३८० लाख टन होते. यंदा ४२१ लाख टनांहून जास्त उत्पादन होण्याचा अंदाज आहे.

## किरकोळ वादातून एकाला जाळण्याचा प्रयत्न

**मुंबई :** किरकोळ वादातून मरिन लाइन्स रेल्वे स्थानकाजवळ एकाला जाळण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आझाद मैदान पोलिसांनी आरोपीला अटक केली. मंगळवारी दुपारी १ वाजता मरिन ड्राइव्ह रेल्वे स्थानकाजवळ एक व्यक्ती जळलेल्या अवस्थेत सापडली, त्याच्यावर सध्या जी. टी. रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपी काळू आणि जळलेल्या अवस्थेत सापडलेली व्यक्ती दाऊद एकमेकांना ओळखत होते. काळू हा एक कचरा वेचक आहे. दाऊद नेहमी काळूचे कपडे आणि इतर वस्तू त्याला न विचारता वापरायचा. त्या रागातून काळूने दाऊदला जाळण्याचा प्रयत्न केला, यात दाऊद ३० टक्के भाजला.

## भिंतीवरून उडी मारून आरोपीचे पलायन

**मुंबई :** काळाचौकी येथील राज्य दहशतवाद विरोधी पथकाच्या शौचालयाच्या भिंतीवरून उडी मारून आरोपीने पलायन गेल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. याप्रकरणी काळाचौकी पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून अधिक तपास सुरू आहे.

एटीएसने फसवणुकीसह अवैध मार्गाने भारतात प्रवेश केल्याप्रकरणी अन्वर ऊर्फ शहादत ऊर्फ शाजु अबुल हाशिम शेख (२९) याला गेल्या वर्षी ८ डिसेंबर रोजी अटक केली होती. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे सातच्या सुमारास शौचालयामध्ये गेला.मात्र तो भिंतीवर चढून उडी मारून पसार झाल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. पोलिसांनी याप्रकरणी परिसरातील सीसीटीव्ही तपासले. मात्र त्याचा शोध लागलेला नाही.

# जलद लोकलमधून पडून पाच महिला जखमी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



डोंबिवली स्थानकात पडलेल्या महिला प्रवाशांवर पोलिसांनी प्रथमोचार केले.

डोंबिवली : कसाऱ्याहून मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला जाणाऱ्या अतिजलद लोकलमधून उतरताना पाच महिला प्रवासी फलाटावर पडून किरकोळ जखमी झाल्याचा प्रकार मंगळवारी सकाळी डोंबिवली रेल्वे स्थानकात घडला. रेल्वे सुरक्षा दलाच्या महिला हवालदारांनी त्यांच्यावर प्राथमिक वैद्यकीय उपचार केले.

शहाड, टिटवाळा रेल्वे स्थानकात कसारा लोकलमध्ये चढून पाच तरुणी डोंबिवली रेल्वे स्थानकात मंगळवारी सकाळी उतरत होत्या. त्यांना लोकलमध्ये चढणाऱ्या प्रवाशांनी उतरू दिले नाही. त्यामुळे पाचही तरुणींनी चढणाऱ्या महिलांना ढकलून फलाटावर उतरण्याचा प्रयत्न केला. त्यांना चढणाऱ्या महिलांचे धक्के लागल्याने त्या फलाटावर पडल्या. या गडबडीत काही महिला प्रवासी या प्रवाशांच्या अंगावरून गेल्या. पाच महिला प्रवासी फलाटावर पडून जखमी झाल्याची माहिती मिळताच डोंबिवली रेल्वे स्थानकातील रेल्वे सुरक्षा दलाचे मुख्य हवालदार डी. एन. सिंग, हवालदार कामिनी सोनकर, साहाय्यक स्थानक व्यवस्थापक एस. के. चौबे, सेविका साक्षी शेळके यांनी धाव घेतली. त्यांनी जखमी महिला प्रवाशांना स्थानक व्यवस्थापकांच्या कार्यालयात नेले. तेथे त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आले.

## मुंबई पोलिसांना दूरध्वनी करणाऱ्याला अटक

**मुंबई :** कुख्यात दाऊद इब्राहिमच्या साथीदाराने आपल्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना मारण्यास सांगितले आहे. त्याचबरोबर मुंबईतील जे. जे. रुग्णालयात बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणाऱ्या २९ वर्षीय तरुणाला मुंबई पोलिसांनी अटक केली. आरोपीविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामरान आमीर खान (२९) असे अटक आरोपीचे नाव असून तो शीव येथील न्यू म्हाडा कॉलनी परिसरात वास्तव्यास आहे.

# कर्ज फेडण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून अपहरणाचा कट

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** कर्ज फेडण्यासाठी एका नामांकित महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी परिसरातील तीन वर्षीय मुलाचे अपहरण करून त्याची दोन लाखांत विक्री करण्याचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार वडाळा परिसरात घडला. याप्रकरणी पोलिसांमुळे अपहरण झालेल्या मुलाची सुखरूप सुटका केली.

वडाळा परिसरात राहणाऱ्या सुमन चौरसिया (२७) यांचा तीन वर्षांचा मुलगा सोमवारी दुपारी साडे बारा ते अडीचच्या सुमारास घराबाहेर खेळत असताना अचानक गायब झाला. चौरसिया यांनी परिसरात मुलाचा शोध घेतला मात्र काहीच थांगपत्ता न लागल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची पाहणी केली असता शेजारी राहणाऱ्या सानिका वाघमारेसोबत मुलगा जात असल्याचे निदर्शनास आले.

पोलिसांनी तपास सुरू केला असता शकील बशीर शेख (१९) व साईनाथ शिवाजी कांबळे (२४) हे हरवलेल्या मुलाला घेऊन पोलीस ठाण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार वडाळा पुलावरून जात असताना ओळखीच्या सानिकाने या मुलाला ताब्यात दिले. मुलगा वाटेत सापडले असून त्याला वडाळा पोलीस ठाण्यात जमा करण्यास तिने सांगितले. पोलिसांनी सानिकाला पोलीस ठाण्यात बोलावून चौकशी केली. तिच्या ओळखीचा पवन पोखरकर (२०) याने तिला १० वर्षांपर्यंतचा मुलगा आणण्यास सांगितले होते. मुलाच्या बदल्यात तो तिला २ लाख रुपये देणार होता. त्यानुसार मुलाची विक्री करण्यासाठी पवनसोबत मुलाला घेऊन टॅक्सीने कल्याण येथे गेली. मात्र तिथे संबंधित व्यक्तींशी संपर्क न झाल्याने कट फसला. अखेर तिने मुलाला पुन्हा वडाळा पुलाकडे येऊन ओळखीच्या व्यक्तीच्या ताब्यात दिल्याची कबुली दिली. त्यानुसार सानिकाला पोलिसांनी अटक केली. चौकशीतून पवन आणि सार्थक राजेंद्र बोंबले यांनाही अटक करण्यात आली.

# एक कोटीची फसवणूक; विकासकाविरोधात गुन्हा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** अभिनेत्री करिष्मा तन्नाचा पती वरुण बंगेरा व अभिनेता समीर कोचर यांनी एक कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार अंधेरी पोलिसांकडे केली असून याप्रकरणी पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. वांद्रे येथे सदनिका देण्याच्या नावाखाली फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे.

प्रोनित प्रेम नाथ व पत्नी अमीषा यांच्याविरोधात अंधेरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याच आला. तक्रारीनुसार अभिनेता समीर कोचर व करिष्मा तन्नाचा पती वरुण बंगेरा यांनी डिसेंबर २०२० मध्ये वांद्रे येथे सदनिका खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी वांद्रे पश्चिम येथील पाली गाव परिसरात प्रोनित नाथ व त्याची पत्नी अमिषा चार मजल्यांची इमारत बांधत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार कोचरने एक कोटी ९५ लाख रुपये व बंगेरा याने ९० लाख रुपयांत सदनिका खरेदी करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी कोचरने ५८ लाख ५० हजार रुपये व बंगेराने ४४ लाख ६६ हजार रुपये भरले. त्यानंतर जून २०२३ मध्ये आरोपीने सदनिका विकायच्या नसल्याचे कळवले. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावेळी संबंधित सदनिका अन्य कोणाला तरी विकण्यात आल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी याप्रकरणी अंधेरी पोलिसांकडे तक्रार केली.

बृहन्मुंबई महानगरपालिका

**शिक्षण विभाग**

(शिक्षण अधिकारी यांचे कार्यालय, त्रिवेणी संगम म्युनिसिपल स्कूल बिल्डिंग, पहिला मजला, महादेव पालव मार्ग, करी रोड, मुंबई-४०००१२)

**नं. ईओटी/८६४ दिनांक : २०.११.२०२३**

**ई-निविदा सूचना**

**बोली क्र. २०२३_एमसीजीएम_९६३९६१**

शिक्षण विभाग, बीएमसी हे **''बीएमसी स्कूल बिल्डिंग येथील ऑरगॅनिक (किचन) गार्डनचा विकास, नियोजन व देखरेख''** याकरिता नामांकित बोलीदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत.

| इरठे (रु.) | ऑनलाइन बोली डाऊनलोडिंग सुरू होणारी तारीख व वेळ | ऑनलाइन बोली सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळ | निविदा वैधता कालावधी |
|---|---|---|---|
| रु. ४,६६,०००/- | २१.११.२०२३ | २८.११.२०२३ | १८० दिवस |

अन्य सर्व तपशील (https://mahatenders.gov.in/nicgep/app) यावर उपलब्ध असलेल्या निविदा प्रपत्रात आहे. सर्क्युलर नंबर- सीए/एफआरजी/०३, दि. ११.०५.२०२३ नुसार विक्रेत्यांनी, ज्यांनी त्यांच्या बोली सादर केल्या आहेत, रु. १५,०००/- + २७००/- (१८% जीएसटी) = १७७००/- चे छाननी शुल्काचे प्रदान करावयाचे आहे.

वरील रक्कम बीएमसीच्या कोणत्याही सीएफसीमध्ये भरता येईल. याकरिता चलन शिक्षण अधिकारी (ईओटी डिपार्टमेंट) यांच्याकडून निर्गमित करण्यात येणार आहे.

स्वाक्षरी/-
शिक्षण अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका

पीआरओ/२०६२/एडीव्ही/२०२३-२४

**खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.**

**डहाणू नगर परिषद**

**ता. डहाणू, जि. पालघर**

**निविदा सूचना**

जा. क्र. डनप/३७२१/२०२३-२४ दिनांक: २१.११.२०२३

मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद हे खालील कामाकरिता निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | विभाग | कामाचे नाव | निविदा फॉर्म किंमत | निविदेसोबत भरावयाची सुरक्षा अनामत |
|---|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभाग | साखरे धरण येथे २०० MM DI व ३०० MM AC जलवाहिनीसाठी जलमापक व त्यास लागणारे सर्व साहित्यासह पुरवठा करून बसविणेबाबत. | रु. ५००/- | रु. ५,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्म हे संबंधित विभागात दि. २२.११.२०२३ ते दि. ३०.११.२०२३ रोजी संध्याकाळी ५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील व निविदा फॉर्म आवक-जावक विभाग दि. २२.११.२०२३ ते दि. ३०.११.२०२३ रोजी संध्याकाळी ४.३० वाजेपर्यंत जमा करावेत. आलेल्या निविदा या मुख्याधिकारी निविदाधारकांच्या समक्ष दि. ३०.११.२०२३ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोयीनुसार उघडण्यात येतील.

२. निविदापोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने/ धनादेशाद्वारे भरून पावतीची मूळ प्रत लिफाफा क्र. ०१ च्या आत व लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशील लिहुन लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ सीलबंद करून निविदा आवक विभागाकडे प्रत्यक्ष दि. / /२०२३ रोजी संध्याकाळी ४.३० पर्यंत जमा करायची आहे.

३. प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**डहाणू नगर परिषद**

MANAPPURAM HOME FINANCE LTD.

**मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड**

पूर्वीची मणप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.

**सीआयएन:** यू६५९२३के१२०१०पीआयसी०३९१७९

**नोंदणीकृत कार्यालय:** IV/४७०ए (जुना)डब्ल्यू/६३८ए(नवीन) मणप्पुरम हाऊस वलापाड थ्रिसूर, केरळ - ६८०५६७

**कॉर्पोरेट कार्यालय:** मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट नं. ३०१ ते ३१५, ''ए'' विंग, ''कनाकिया वॉल स्ट्रीट'', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पू.), मुंबई - ४०००९३, महाराष्ट्र. **फोन नं.:** ०२२-६६२११०००, **वेबसाइट:** www.manappuramhomefin.com

**मागणी सूचना**

याद्वारा सूचना देण्यात येते की, खालील ऋणकोंनी कंपनीकडून त्यांच्याद्वारा प्राप्त केलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल व व्याज रकमेची परतफेड करण्यास कसूर दाखविली आहे आणि कर्जाचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (''एनपीए'') म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत याखाली तपशीलवारपणे दिल्यानुसार उक्त ऋणकोंच्या माहितीप्रित्यर्थ या अतिरिक्त त्यांच्याद्वारा कंपनीकडे तरतूद केल्यानुसार त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर या जाहीर सूचनेद्वारा त्यांच्याकरिता निर्गमित केलेल्या दिनांकित सूचनेद्वारा त्यांना कळविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | ऋणको/ सह-ऋणकोचे नाव/ एलएएन/ शाखा | सुरक्षित मत्तेचे वर्णन ज्याकरिता स्वारस्याची निर्मिती केली आहे | एनपीए तारीख | सूचना पाठविण्याची तारीख व थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सागर उल्हास हजारे/ वनिता सागर हजारे/ सोहनलाल सोनाराम गुर्जर/ **एनएचएल००२१०००३२०३**/ कल्याण | फ्लॅट नं. ३०१, ''बी'' विंग, तिसरा मजला, बिल्डिंग नं. ०८, स्टार रेसिडेन्सी, मौजे - घोटसाई, गणपती मंदिर रोड, अंकार पाडा, टिटवाळा (प.), गणपती मंदिर, कल्याण, पी.ओ. टिटवाळा, ठाणे, महाराष्ट्र, पिन: ४२१६०५. | ०८.११.२०२३ | १०.११.२०२३ व रु. ११,०९,४९२/- |
| २ | महेश मन्नालाल चौहान/ अनमोल महेश चौहान/ पतन मन्नालाल चौहान/ **एनएलएपी०००५००४९६५**/ विरार | फ्लॅट नं. ३०१, तिसरा मजला, श्री मार्लेश्वर अपार्टमेंट सीएचएस, शनि मंदिर रोडजवळ, कोपरी, विरार (पू), पालघर, महाराष्ट्र, पिन: ४०१३०५. | ०९.११.२०२३ | ११.११.२०२३ व रु. ९,९४,८४२/- |

वरील ऋणकोंना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत थकीत रकमेचे प्रदान करावे, त्यास असमर्थ ठरल्यास सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सूचनेच्या निर्गमनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील पावले उचलण्यात येतील.

**दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२३**
**स्थळ: महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**मणप्पुरम होम फायनान्स लि.**

**जे. बी. केमिकल्स ॲण्ड फार्मास्युटिकल्स लिमिटेड**

GOOD PEOPLE for GOOD HEALTH

**नोंदणी. कार्यालय :** नीलम सेंटर, 'बी' विंग, ४ था मजला, हिंद सायकल रोड, वरळी, मुंबई ४०००३०.
**कॉर्पोरेट कार्यालय :** सिनर्जी आयटी पार्क, युनिट ए, ८ वा मजला, आप्पा साहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.
दूरध्वनी : ०२२-२४३९ ५२००/ २४३९ ५५०० फॅक्स: ०२२ - २४३१ ५३३१/ २४३१ ५३३४
सीआयएन: एल२४३९०एमएच१९७६पीएलसी०१९३८० संकेतस्थळ : www.jbpharma.com ई-मेल : investorrelatiions@jbpharma.com

**सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की कंपनी व्यवहार मंत्रालयद्वारे जारी करण्यात आलेली साधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित एप्रिल ८, २०२०, १७/२०२० दिनांकित एप्रिल १३, २०२०, २०/२०२० दिनांकित मे ५, २०२०, २२/२०२० दिनांकित जून १५, २०२०, ३३/२०२० दिनांकित सप्टेंबर २८, २०२०, ३९/२०२० दिनांकित डिसेंबर ३१, २०२०, १०/२०२१ दिनांकित जून २३, २०२१, २०/२०२१ दिनांकित डिसेंबर ८, २०२१, ३/२०२२ दिनांकित मे ५, २०२२, ११/२०२२ दिनांकित डिसेंबर २८, २०२२ आणि सामान्य परिपत्रक क्र. ९/२०२३ दिनांकित सप्टेंबर २५, २०२३ (ह्यानंतर एमसीए परिपत्रके असा संदर्भ असलेल्या) सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या कलम ११० (कायदा) आणि कायद्याच्या लागू असलेल्या अन्य तरतूदी आणि वेळोवेळी फेरफार करण्यात आलेल्या कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ च्या नियम २२ (कोणत्याही संवैधानिक फेरफार किंवा सध्या अंमलबजावणी होत असलेल्यासह) च्या अनुषंगाने कंपनी, जेबीसीपीएल एम्प्लॉई स्टॉक ऑप्शन स्कीम २०२१ नामक कंपनी एम्प्लॉई स्टॉक ऑप्शन स्कीममध्ये फेरफार करण्यासाठी पोस्टल बॅलटद्वारे कंपनीच्या सभासदांची सहमती प्राप्त करण्यासाठी जसे पोस्टल बॅलट नोटीस दिनांकित नोव्हेंबर ७, २०२३ (नमूद पोस्टल बॅलट नोटीस ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या विशेष ठरावावर संमती घेण्यात येणार आहे.

कंपनीने २० नोव्हेंबर २०२३ रोजी कंपनीच्या ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट/डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत नोव्हेंबर १०, २०२३ (कट ऑफ दिनांक) अनुसार केले आहे, त्यांना २० नोव्हेंबर २०२३ रोजी स्पष्टीकरणात्मक विधानासह पोस्टल बॅलेट नोटीस पाठवणे पूर्ण केले आहे. सदर पोस्टल बॅलट नोटीस प्राप्त करण्याचा सभासदांचा हक्क आणि त्या ठरावावर मतदान करण्याचा अधिकार कट ऑफ तारखेनुसार गणला जाईल आणि कट ऑफ तारखेनुसार कंपनीचा सदस्य नसलेल्या व्यक्तीने वागावे. ही पोस्टल बॅलेट सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने. सदस्यांचा मतदानाचा अधिकार कट ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड-अप इक्विटी भाग भांडवलाच्या त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असेल.

भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४४ चे पालन करून, सुधारित ('लिस्टिंग रेग्युलेशन्स') म्हणून, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 दिनांक १२ मे २०२०, सह वाचल्या जाणाऱ्या SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11 दिनांक १५ जानेवारी २०२१, आणि SEBI/HO/CFD/CFD-POD-2/P /CIR/2023/167 दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ आणि कायद्याच्या कलम १०८ आणि ११० च्या तरतुदींनुसार, त्याखाली तयार केलेल्या नियमांसह आणि एमसीए परिपत्रकांसह वाचलेल्या तरतुदींनुसार, प्रस्तावित ठरावावर मतदान करण्याची पद्धत केवळ ई-व्होटिंगपुरती मर्यादित आहे. म्हणजे, पोस्टल बॅलेट फॉर्म सबमिट करण्याऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करून. एमसीए परिपत्रकांच्या सक्षम तरतुदींनुसार, नोटिसची हार्ड कॉपी, पोस्टल बॅलेट फॉर्म आणि टपाल प्री-पेड उत्तर लिफाफा सदस्यांना पाठविला जात नाही आणि त्यानुसार सदस्यांना विनंती केली जाते की त्यांनी त्यांची संमती किंवा असहमत रिमोट ई-व्होटिंगद्वारेच कळवावे.

कंपनीच्या सदस्यांना याद्वारा कळविण्यात येते आहे तसेच नोंद घेण्याची विनंती करण्यात येते की :

(ए) उक्त पोस्टल बॅलट नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर रिमोट ई-वोटिंग (म्हणजेच कोणत्याही ठिकाणावरून ई-वोटिंग) सुविधेद्वारा सदस्यांद्वारा विचारविनिमय करावयाचे आहे. ईलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा मतदान करणे सुकर होण्याकरिता नॅशनल सिक्युरिटिज डिपॉझीटरी लिमिटेडद्वारा ("एनएसडीएल"), जी अधिकृत एजन्सी आहे, रिमोट ई-वोटिंग सुविधेची तरतूद करून देण्यात येत आहे. रिमोट ई-वोटिंग सिस्टमचा वापर करून मतदान करण्याच्या सुविधेची तरतूद सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ आणि कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०८च्या तरतुदींच्या अनुसार "एनएसडीएल"द्वारा करून देण्यात आली आहे.

(बी) प्रक्रियेबाबतचा तपशील आणि रिमोट ई-वोटिंग प्रणाली उक्त पोस्टल बॅलट नोटीससह वाचलेल्या ईमेलद्वारा सदस्यांना पाठविण्यात आली आहे.

(सी) उक्त पोस्टल बॅलट नोटीस www.jbpharma.com या कंपनीच्या वेबसाइटवर, www.evoting.nsdl.com या "एनएसडीएल"च्या वेबसाइटवर, www.bseindia.com या बीएसई लि.च्या (बीएसई) वेबसाइटवर आणि www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या (एनएसई) वेबसाइटवर उपलब्ध आहे.

(डी) रिमोट ई-वोटिंग मंगळवार, २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी स.०९.०० वा (भाप्रवे) सुरू झाली आहे आणि बुधवार, २० डिसेंबर, २०२३ रोजी सायं. ०५.०० वा (भाप्रवे) संपेल. त्यानंतर मतदानाकरिता ई-वोटिंग प्रणाली "एनएसडीएल"द्वारा निःसमर्थ करण्यात येईल आणि रिमोट ई-वोटिंगकरिता पूर्वोक्त तारीख व वेळेदरम्यान अनुमती दिली जाणार नाही. ठरावावर एकदा मतदान केले गेल्यास, सदस्यास तदनंतर ते बदलण्यास अनुमती दिली जाणार नाही किंवा त्यास मतदान पुन्हा करता येणार नाही.

(ई) वरील मतदान कालावधीदरम्यान, कंपनीचे सदस्य ज्यांच्या जवळ कट-ऑफ तारखेनुसार प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात भाग आहेत तेच केवळ रिमोट ई-वोटिंगद्वारा त्यांचे मतदान करण्यास हक्कदार असतील.

(एफ) कंपनीच्या संचालक मंडळाने रिमोट ई-वोटिंग प्रक्रियेचे स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने आयोजन होण्याकरिता परीनिरीक्षक म्हणून श्री आशिष भट्ट, आशिष भट्ट अँड असोसिएट्सचे मालक, प्रॅक्टिसींग कंपनी सेक्रेटरी यांची नेमणूक केली आहे.

(जी) पोस्टल बॅलटचा निकाल परीनिरीक्षकाच्या अहवालासमवेत शुक्रवार, २२ डिसेंबर, २०२३ रोजी किंवा तत्पूर्वी घोषित करण्यात येणार आहे. सदर निकाल www.jbpharma.com या कंपनीच्या वेबसाइटवर व www.evoting.nsdl.com या "एनएसडीएल"च्या वेबसाइटवर आणि एनएसई व बीएसईला कळविण्यात येईल तसेच अनुक्रमे www.nseindia.com व www.bseindia.com या त्यांच्या वेबसाइट्सवरसुद्धा उपलब्ध असणार आहे.

(एच) ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट / डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी रिमोट ई-वोटिंगकरिता युजर आयडी व पासवर्डच्या प्रापणाकरिता खालील प्रक्रियेचे अनुसरण करावे :

* जर प्रत्यक्ष स्वरूपात भाग असल्यास, कृपया तुमचे नाव, फोलिओ नं., भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) इ. ची investorrelations@jbpharma.com यावर ई-मेल पाठवून तरतूद करावी.

* जर डिमटेरियलाईज्ड स्वरूपात भाग असल्यास, कृपया तुमचे नाव, डीपी आयडी-क्लाइंट आयडी, क्लाइंट मास्टर किंवा एकत्रीकृत खाते विवरणाची प्रत, पॅन (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) इ. ची investorrelations@jbpharma.com यावर ई-मेल पाठवून तरतूद करावी.

* पर्यायी, भागधारक वर नमूद केलेल्या तपशीलाची तरतूद करून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून evoting@nsdl.co.in यावर ई-मेलद्वारा विनंती पाठवू शकतील.

(आय) सदस्य फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेशन्स (एफएक्यू'ज) (भागधारकांकरिता) आणि www.evoting.nsdl.com यावर भागधारकांकरिता उपलब्ध असलेले ई-वोटिंग युजर मॅन्युअल पाहू शकतील किंवा टोल-फ्रि क्र.: ०२२-४८८६ ७००० व ०२२-२४९९ ७००० यावर कॉल करू शकतील; आणि

(जे) सदस्य "एनएसडीएल"च्या खालील व्यक्तींशी, ज्या ई-वोटिंग सुविधेसंबंधित कोणत्याही तक्रारींचे, जर असल्यास, निराकरण करण्यास जबाबदार आहेत, संपर्क साधू शकतील :
नाव : श्री. अमित विशाल / श्रीमती पल्लवी म्हात्रे
पदनाम : सहा. उपाध्यक्ष / वरीष्ठ व्यवस्थापक
पत्ता : नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड
कार्यालय : ट्रेड वर्ल्ड, "ए" विंग, ४था मजला, कमला मिल्स कंपाउंड, लोअर परळ, मुंबई-४०००१३
टेलिफोन : टोल-फ्रि क्र.: ०२२-४८८६ ७००० व ०२२-२४९९ ७०००
ईमेल : evoting@nsdl.co.in

**जे.बी. केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स लि.करिता**
**स्वाक्षरी/-**
**संदीप फडणीस**
**कंपनी सचिव**
**सदस्यत्व क्र. : ए११५३०**

स्थळ : मुंबई
दिनांक : २२ नोव्हेंबर २०२३